# वर्षाला ५० हजार मराठी इ बुकांची विक्री

## मराठी इ - बुक, इ-लायब्ररी, ऑनलाईन पुस्तक खरेदी जोरात

**शिल्पा सुर्वे** |
दि. १४ (मुंबई)

बुकगंगा.कॉम या संकेतस्थळावर सध्या महिन्याला ३५० च्या आसपास मराठी इ-बुक येत आहेत. सध्या वर्षाला ५० हजार इ-बुक आणि छापील पुस्तके विकली जातात. इ-बुक म्हणजे पुस्तक इंटरनेटवरून डाऊनलोड करून संगणकावर किंवा टॅबलेटवर वाचणे. ही खरेदी क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंगद्वारे करता येते.

ऑनलाईनमधील विश्वासार्हता वाढल्याने मराठी माणूस इ-खरेदीला पसंती देत आहे, आगामी काळात महिन्याला १ ते २ हजार नवीन इ-बुक उपलब्ध करून दिली जातील, अशी माहिती बुक गंगाचे हर्षद मरकड यांनी दिली. त्यांच्या इ-लायब्ररी या संकल्पनेअंतर्गत महिन्याला ठराविक सभासद वर्गणी भरून पाच मराठी पुस्तके ऑनलाइन वाचता येतात.

मराठी प्रकाशकांचा इ-बुकसाठीचा ओढा वाढत चालला आहे. छापील पुस्तकांच्या जोडीला इ-बुक, अशा दोन्ही माध्यमांचा विचार आता प्रकाशक करीत आहेत. अनेक नामांकित प्रकाशन संस्थांनी आपली सर्व पुस्तके इ-बुकच्या स्वरूपात उपलब्ध करून द्यायचे ठरविले आहे. छपाईचा खर्च येत नसल्याने छापील पुस्तकांच्या किंमतीपेक्षा इ-बुक २० ते २५ टक्के स्वस्त पडते.

**ऑनलाईन मागणी- आमच्या आयुष्यातील काही आठवणी/ लॉक ग्रिफीन**

टॉप टेन पुस्तके- पाठ फिरवा पाठदुखीला, शाळा, शेतीचे कायदे, पानिपत, लपवलेल्या काचा, आगळीवेगळी मानसरोवर यात्रा, बटाट्याची चाळ, कॉर्पोरेट आयडीयल रतन टाटा, आमचा बाप आणि आम्ही, आयुर्वेदिक गर्भसंस्कार.